राज्यातील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था/केंद्र येथे प्रवेशाच्यावेळीच लोकसभा, विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी प्रशिक्षणार्थ्यांची नावे मतदार यादीमध्ये नांव नोंदणी करण्याची कार्यवाही करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-३३१९/प्र.क्र.५८/व्यशि-३

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,

हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई ४०० ०३२.

दिनांक: २२ जुलै, २०१९.

<u>प्रस्तावना: -</u>

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेड ए अन्वये राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका (महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती) मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणामध्ये घेण्याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे व त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने दिलेले आदेश सर्वांवर बंधनकारक आहेत.

२. आपल्या देशाने लोकशाही पध्दत स्विकारली असून १८ वर्षावरील सर्व मुला-मुलींना सांविधानिक संस्थांच्या निवडणूकांमध्ये मतदानाचा हक्क आहे. सबब १८ वर्षावरील सर्व व्यक्तींनी मतदार यादीमध्ये त्यांची नावे नोंदविणे आवश्यक आहे व होणाऱ्या प्रत्येक निवडणूकीमध्ये मतदान करणे अपेक्षित आहे.

३. भारत निवडणूक आयोगाकडून तयार होणारी मतदार यादीच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीसाठी राज्य निवडणूक आयोग वापरते.

४. नवीन मतदारांची नावे नोंदविणे तसेच मतदार यांदयामध्ये दुरुस्ती करण्याची कार्यवाही भारत निवडणूक आयोगाकडून निरंतर चालु असते. मात्र दरवर्षी सप्टेंबर-ऑक्टोबर याकरीता "मतदार यादी पुनरिक्षण कार्यक्रम (Summary Revision)" या नावाने धडक कार्यक्रम हाती घेण्यात येतो. या संपूर्ण प्रक्रीयेमध्ये भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे राज्यातील मुख्य निवडणूक अधिकारी, सर्व जिल्हाधिकारी व सर्व महानगरपालिका आयुक्त इत्यादी आवश्यक ती कार्यवाही करतात. असे असूनही मतदार यादीमध्ये अनेक त्रुटी असल्याच्या तक्रारी वारंवार प्राप्त होतात उदा.

(अ) १ जानेवारीला १८ वर्षे पूर्ण झालेल्या व्यक्तींच्या नावांची नोंदणी न होणे व

(आ) नमुना क्रमांक ६, ७, ८ व ८ अ यामध्ये माहिती भरुनही मतदार याद्यांमध्ये योग्य ती दुरुस्ती न होणे, इ.

५. वरील तक्रारींचा अभ्यास करता असे दिसून येते की, इयत्ता १२ उत्तीर्ण होणारीत मुले व मली औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेत असतात. अशी प्रवेश घेणारी मुले १८ वर्षे पूर्ण केलेली असतात. या सर्व मुला मुलींची नावे मतदार यादीमध्ये कशाप्रकारे नोंदविता येईल याबाबत अनेक स्तरावर चर्चा होऊन त्याबाबत एक ठोस व्यवस्था निर्माण करण्याबाबत मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांनी दि.०५ जानेवारी २०१९ रोजी झालेल्या चर्चेत निर्देश दिले होते.

६. सदर सर्व बाबीचा विचार करुन शासन खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करित आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

(१)

I. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या मुला/मुलींकडून खालील आशयाचे प्रमाणपत्र/हमीपत्र घेण्याबाबत प्रवेशअर्जामध्ये योग्य ती सुधारणा करण्यात यावी. “मी दिनांक ०१/०१/२०XX रोजी १८ वर्षाचा /वर्षाची झालो/झाले आहे किंवा होणार आहे. मी माझे नांव मतदार यादीत नोंदविला आहे/१८ वर्ष पूर्ण झाल्याबरोबर मी माझे नाव मतदार यादीत नोंदवून घेणार आहे अशी मी प्रतिज्ञा करतो/करते यासाठी सोबत जोडलेला नमुना ६, ७, ८ व ८ अ व्यवस्थितपणे भरलेलो आहे”

II. प्रत्येक संस्थेच्या प्राचार्यांनी त्यांच्याकडील एका गटनिदेशक/शिल्पनिदेशक यांची या कामासाठी नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात येईल त्यांनी सर्व मुला मुलींना आवश्यतेप्रमाणे नमुना क्रमांक ६, ७, ८ व ८अ जमा करावेत.

III. नोडल अधिकारी यांनी वरील भरलेले सर्व फॉर्म कमीत कमी वर्षातून दोन वेळा संबंधित जिल्हाधिकारी किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले अधिकारी यांच्याकडे सुपूर्द करावेत व पोचपावती घ्यावी.

IV. मतदार नोंदणी अधिकारी यांनी वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या सर्व अर्जावर कालबध्द पध्दतीने कार्यवाही करुन योग्य तो निर्णय घ्यावा व मतदार यादीत तशी दुरुस्ती करावी. त्याबाबत खात्री जिल्हाधिकारी यांनी करावी.

V. मतदार यादीत नाव नोंदविलेल्या सर्व मुले/मुलींना जिल्हाधिकारी यांचे कडून नोडल अधिकारी यांनी त्वरीत ओळखपत्र प्राप्त करुन घेवून ते संबंधितानां देण्यात यावे. त्वरीत देणे शक्य नसल्यास वरील ओळखपत्रांचे वाटप दरवर्षी भारत निवडणूक आयोगाव्दारे दि.२५ जानेवारी साजरा होणाऱ्या “राष्ट्रीय मतदार दिनाच्या” दिवशी करण्यात यावे.

VI. संबंधित संस्थांचे प्राचार्य, व नोडल अधिकारी यांनी संबंधित जिल्हाधिकारी यांच्याबरोबर समन्वय साधून ही प्रक्रिया बिनचूक राबविण्याची जबाबदारी उचलावी.

२. राज्यातील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था/ केंद्र यांनी वरीलप्रमाणे कार्यवाही करावी.

३. a) या आदेशानुसार विहित कार्यपध्दती सुरळीत पार पाडण्याची जवाबदारी प्रत्येक संस्थेच्या प्राचार्यांनी त्यांच्याकडील एका गटनिदेशक/शिल्पनिदेशक यांची राहील. उदा.

नोडल अधिका-यांना प्रशिक्षित करणे, त्यांच्या बैठका/आढावा घेणे, त्यांच्या शंकांचे निरसन करणे, मतदार जागृती अभियानासाठी साहित्य पुरविणे, इ.

a) सदर शासन निर्णय मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक २०.१२.२०१९ व दिनांक १४.०१.२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक संकेतांक २०१९०७२२१७२०१४६१०३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Baban Sheshrao Mandwe

Digitally signed by Baban Sheshrao Mandwe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development And Entrepreneurship Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d101a905c7fca95ea9a4a68053d53dda9fcd8b54a203c383517611e96421b187, cn=Baban Sheshrao Mandwe
Date: 2019.07.23 12:32:32 +05'30'

(ब. शे. मांडवे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मुख्य निवडणूक अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक,
४. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. सर्व सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, (संचालनालयामार्फ़त)
६. सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय, (संचालनालयामार्फ़त)
७. सर्व संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्था, (संचालनालयामार्फ़त)
८. निवडनस्ती (व्यशि-३), कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत माहितीसाठी-

१. मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.